महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

सोमवार दि.२० एप्रिल २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २४६ किंमत २ रुपये 7499615933

**प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे**

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

# भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ ने डॉ.श्री शामसुंदर पंडितराव कणके सन्मानित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । विजय जगताप**

ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ देऊन गौरव करण्यात आला. समाजासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या महान व्यक्तींच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्यातून इतरांनाही प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. शनिवार दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजता पुणे स्वारगेट येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहामध्ये अत्यंत उत्साहपूर्ण, दिमाखदार वातावरणात संपन्न झालेल्या या सोहळ्यात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सेवाभावी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आयकर आयुक्त मुंबई डॉ. सचिन मोटे, भारत विभूषण पंजाब सरकार श्री दिगंबर तायडे, सहाय्यक पोलीस आयुक्त पुणे सौ. रुक्मिणीताई गलांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री राम मांडुरके व अध्यक्ष अशोक गोरड उपस्थित होते. यावेळी ए. डी. फाउंडेशनच्या सकारात्मक विधायक व सातत्यपूर्ण वाटचालीबद्दल सर्वच मान्यवरांनी कौतुक केले.

तसेच व्यासपीठावरील प्रमुख पाहुणे आयकर आयुक्त मुंबई डॉ. सचिन मोटे आणि इतर मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड यांनी केले.सामाजिक विभाग, सेवाभाव आणि सुसंस्कृत दृष्टिकोन या तीन आधारांवर उभे असलेले व्यक्तिमत्व म्हणजे हेगडेवार शाळेजवळील सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. शामसुंदर पंडितराव कणके. श्री शामसुंदर कणके यांनी गोरगरीब समाजातील वंचित घटकातील, मुला, मुलींसाठी शाळा काढून त्यांना मोफत आणि दर्जेदार शिक्षण दिले. तसेच मराठवाडा, विदर्भ, खानदेश हा प्रदेश सतत दुष्काळाच्या छायेत असल्याने येथे मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करतात. या आत्महत्या थांबवण्यासाठी कणके यांनी सिंधुताई सपकाळ, ज्ञानेश वाकुडकर यांच्यासोबत व्याख्याने देऊन शेतकऱ्यांना आत्महत्या न करण्याचे कळकळीचे



आवाहन केले. तसेच तेथील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना भेटी देऊन त्यांना कायमचे स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी त्यांच्या ५०० मुले, मुलींना छत्रपती संभाजीनगर येथे आणून त्यांना उच्च शिक्षणापर्यंतचे मोफत व दर्जेदार शिक्षण दिले. या प्रकल्पातून बरीचशी मुले आणि मुली आज उच्च शिक्षण घेत असून नोकरी व्यवसायात स्थिर स्थावर झाली आहेत. या सर्व कामी बिटवाईज कंपनी पुणे, मॅन अँड डिझेल कंपनी छत्रपती संभाजीनगर तसेच मुला मुलींच्या फीस साठी डव्होकेट अतुल शहा मुंबई, विजय झरकर दुबई, उदय देशमुख जर्मनी, वासुदेव पटेल गुजरात, श्वेता भारतीया, डॉ. मंगेश कदम दोघेही छत्रपती संभाजीनगर अशा प्रतिष्ठित दानशूर व्यक्तींची मदत होत असते. तसेच याचबरोबर पर्यावरण संतुलनासाठी हजारोंच्या वर वृक्षारोपण त्यांनी केले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल म्हणून त्यांना सामाजिक क्षेत्रातील आदर्श समाजसेवक म्हणून भारतरत्न डॉ. ए पी जे अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ देऊन त्यांना गौरवण्यात आले. या व्यतिरिक्त आतापर्यंत त्यांना सेवातीर्थ फाउंडेशनचा भारत गौरव पुरस्कार, आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन पुणे यांचा महाराष्ट्र गौरव सन्मान पुरस्कार, जीवन जागृती सेवा संस्थेचा भारत एक्सलन्स अवॉर्ड तसेच बालगंधर्व परिवार पुणे यांचा बालगंधर्व पुरस्कार, पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठ, वृंदावन मथुरा, उत्तर प्रदेश यांचा विद्यावाचस्पती सारस्वत सन्मान अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. आजही त्यांचा हा प्रकल्प गोरगरीब वंचित अनाथ होतकरू शेतकरी कुटुंबातील मुला मुलींच्या शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथे चालू आहे. कार्यक्रमात निवड झालेल्या सर्व पुरस्कार्थींना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ए. डी. फाउंडेशन समूहाच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नम्रता बागरेचा यांनी प्रभावीपणे करुन उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून समाजातील महान व्यक्तींच्या कर्तृत्वाला सलाम करणारा, प्रेरणादायी सोहळा ठरला.

# खरीप हंगामात नियमानुसार विमा भरूनही नुकसान भरपाई न मिळाल्याने शेतकरी संतप्त

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**



शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी राबविण्यात येणारी प्रधानमंत्री पिक विमा योजना देगलूर तालुक्यात अपयशी ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. खरीप हंगामात नियमानुसार विमा भरून ही नुकसान भरपाई न मिळाल्याने शेतकरी संताप झाले असून आक्रोश व्यक्त करत आहेत.

देगलूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन, तूर आणि कापूस या पिकांसाठी मोठ्या अपेक्षेने विमा घेतला होता. मात्र अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि रोगराईमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. तरीही शेतकऱ्यांच्या खात्यात एकही रुपया जमा झालेला नाही. त्यामुळे 'शेतात सर्व काही उद्ध्वस्त झाले. पण खात्यात शुन्यच!' अशी तीव्र प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत.

योजनेत कागदोपत्री अडथळे, तक्रार प्रक्रियेतील विलंब आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. प्रत्यक्ष शेतात नुकसान स्पष्ट दिसत असतानाही मदतीऐवजी केवळ कारणे दिली जात असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत.

चौकटीत घ्या


दरम्यान, संबंधित यंत्रणे कडून कोणताही ठोस प्रतिसाद मिळत नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. शेतकऱ्यांना आधार देणारी योजना आता त्यांच्या नाराजीचे कारण ठरत असून प्रशासनावरील विश्वास कमी होत चालला आहे. संतप्त शेतकऱ्यांनी तात्काळ नुकसान भरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याच्या इशाराही त्यांनी दिला आहे.

# खरवंडी परिसरात आधुनिक सुविधांनी सज्ज 'साईदिप हॉस्पिटल'चा दिमाखात शुभारंभ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

खरवंडी परिसरातील नागरिकांसाठी आरोग्य सुविधांची मोठी उणीव भरून काढणाऱ्या साईदिप हॉस्पिटल व स्वामी समर्थ मेडिकल या अत्याधुनिक आरोग्य सेवेच्या केंद्राचा शुभारंभ अक्षयतृतीयेच्या शुभ मुहूर्तावर रविवारी (दि. १९ एप्रिल २०२६) मोठ्या उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. यावेळी धार्मिक विधी व पूजन करून मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. आमदार मोनिकाताई राजळे या होत्या. शुभहस्ते उद्घाटन ह.भ.प. गुरुदेव महंत आदिनाथ महाराज शास्त्री (श्रीक्षेत्र तारकेश्वरगड) यांच्या हस्ते पार पडले.या प्रसंगी प्रमुख उपस्थितीत मा. प्रताप काका ढाकणे, मा. डॉ. ए. बी. जायभाये, मा. डॉ.



गौतम काळे, मा. डॉ. दीपक जायभाये, मा. डॉ. रवी ठाणगे मा. डॉ. आरती जायभाये, मा. अभय काका आव्हाड मा. डॉ. भगवान दराडे यांच्यासह अनेक मान्यवर, नागरिक व वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, साईदिप हॉस्पिटलच्या माध्यमातून नागरिकांना वेळेवर व परवडणारी वैद्यकीय सेवा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.कार्यक्रमाचे नियोजन श्री. अक्षय बुवासाहेब खेडकर, डॉ. निलेश बुवासाहेब खेडकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. नवीन हॉस्पिटलमुळे खरवंडी व परिसरातील रुग्णांना आता अत्याधुनिक उपचार सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार असून, यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# परळीत श्री.भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त शानदार शोभायात्रा; आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते झाला शुभारंभ

## शिस्तबद्ध व मंगल वातावरणाच्या आदर्शाने शोभायात्रा लक्षवेधी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

भगवान परशुराम यांच्या जयंती निमित्त परळी शहरात शानदार शोभायात्रा काढण्यात आली. आ. धनंजय मुंडे व नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते शोभा यात्रेचा शुभारंभ झाला. शांतता व शिस्तीच्या आदर्शाने शोभायात्रा लक्षवेधी ठरली. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने हिंदू धर्मप्रेमी सहभागी झाले होते. सकल ब्राह्मण समाज यांच्या वतीने या शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.



संत जगमित्रनागा मंदिर येथुन शोभायात्रेला प्रारंभ झाला. प्रारंभी आ. धनंजय मुंडे ,नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, दिव्यांग कल्याण मंत्रालय उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, आदी मान्यवरांच्या हस्ते भगवान परशुराम प्रतिमेचे पूजन करून व माल्यार्पण करून शोभायात्रेस सुरूवात झाली. नेहरू चौक - राणी लक्ष्मीबाई टॉवर चौक- गणेशपार -नांदूरवेस - सरकारवाडा - अंबेवेस- काळाराम मंदिर पर्यंत नगरप्रदक्षिणा करण्यात आली. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी व उपस्थित सर्व महिलांच्या शुभहस्ते भगवान परशुरामांची आरती करून जन्मोत्सव सोहळ्याचा समरोप झाला. या दिव्य सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. ब्राह्मण समाज बांधव सहकुटुंब या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सोहळ्यात महिलांचा लक्षणिय सहभाग होता.

सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने श्री भगवान परशुराम जन्मोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. परळी शहरातून मुख्य मार्गावर शांतता व शिस्तीच्या आदर्शाने निघालेली शोभायात्रा लक्षवेधी ठरली. 'भारत माता की जय','वंदे मातरम्','जय श्रीराम -जय परशुराम' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.ठिकठिकाणी शोभायात्रेचे स्वागत करून नागरीकांनी भगवान परशुरामाचे दर्शन घेतले. जुन्या गावभागात जागोजागी रांगोळी व महिलांनी भगवान परशुरामांचे औक्षण करून दर्शन घेतले. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने हिंदू धर्मप्रेमी नागरीक, सर्व ज्ञातीय बांधव, समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सकल ब्राह्मण समाज आयोजित भगवान परशुराम जन्मोत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

# अमरसिंह पंडित यांना विधानपरिषदेवर संधी द्या–राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा शितल धोंडरे यांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । आकाश सोनवणे**

माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी जिल्ह्याच्या विकासात आणि पक्ष संघटनेत दिलेले योगदान पाहता, त्यांना आगामी विधानपरिषद निवडणुकीत काम करण्याची संधी देण्यात यावी, अशी आग्रही मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्याध्यक्षा शितल धोंडरे यांनी केली आहे.

या संदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात शितल घोंडरे यांनी म्हटले आहे की, अमरसिंह पंडित यांचा दांडगा जनसंपर्क आणि प्रशासकीय कामाचा अनुभव पक्षासाठी नेहमीच फायदेशीर ठरला आहे. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालणारा नेता म्हणून त्यांची ओळख आहे. मराठवाडा आणि विशेषतः बीड जिल्ह्याचे प्रश्न विधिमंडळात प्रभावीपणे मांडण्यासाठी त्यांच्यासारख्या अनुभवी नेतृत्वाची गरज आहे. अमरसिंह पंडित यांनी यापूर्वी देखील आपल्या कार्यकाळात विकासाची अनेक कामे मार्गी लावली आहेत. सध्याची राजकीय परिस्थिती आणि पक्षाची बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी त्यांना विधानपरिषदेवर पाठवणे आवश्यक असल्याचे मत धोंडरे यांनी व्यक्त केले. या मागणीमुळे राजकीय



वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, पक्षश्रेष्ठी यावर काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वाई बाजार येथे भीम जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रमांचा महापूर; रक्तदान शिबिर व वकृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । अविनाश पठाडे**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून वाई बाजार येथे विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' हा संदेश केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता, तो प्रत्यक्ष कृतीतून साकारल्याने वाई बाजारच्या या जयंती उत्सवाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या जयंती सोहळ्याची सुरुवात १४ एप्रिल रोजी सकाळी ठीक ९ वाजता निळ्या ध्वजाच्या ध्वजारोहणाने झाली. उपासक दिलीप खडसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून धम्मध्वजाला मानवंदना देण्यात आली, तर बुद्ध विहार जवळील पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण उपासिका अंजनाबाई गायकवाड यांच्या हस्ते पार पडले. सामूहिक पंचशील ग्रहण केल्यानंतर रक्तदान शिबिराला सुरुवात झाली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रुग्णालयांमध्ये रक्ताचा होणारा तुटवडा लक्षात घेऊन वाई बाजारच्या तरुणांनी हा पुढाकार घेतला होता. या शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान करून महामानवाला अभिवादन केले. यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय रक्तपेढीच्या चमूने रक्त संकलनाचे काम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले. यात समाधान जाधव, निरंजन केशवे, पिंटू पाटील, डॉ. रमेश गावंडे, अंबादास राजूरकर, सहाय्यक



पोलिस निरीक्षक रमेश जाधवर सर, साजिद खान, खान उस्मान खान चांदखान पठाण, डॉ. झनक मानकर, नवीद खान, यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली. जयंती उत्सवाचा भाग दोन म्हणून १७ एप्रिल रोजी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तब्बल ९२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या वक्तृत्वाचा ठसा उमटवला. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ड. छंदक वाठोरे यांनी केले. यात लहान गटात आर्णव सारंग साळुंके (प्रथम), शौर्या मुनेश्वर थोरात (द्वितीय), माही आकाश सातव (तृतीय), निहारिका रणजीत शेंडे (चतुर्थ), मोठा गटात दिव्यांनी मनोज पवार (प्रथम), पूर्वी पिंटू चव्हाण (द्वितीय), किर्ती अरविंद राठोड (तृतीय), वेदिका रवी राठोड (चतुर्थ) अश्या प्रकारचे विद्यार्थ्यांनी नंबर मिळवला यात पर्यवेक्षक म्हणून प्रा. विनोद गेडाम, ड. छंदक वाठोरे, अर्चना घोलार मॅडम हे होते. कार्यक्रमाच्या सांगतेप्रसंगी १७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता समता सैनिक दलाच्या उपस्थितीत भव्य पथसंचन रॅली काढण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठीविहार समितीचे अध्यक्ष प्रल्हाद खडसे, उपाध्यक्ष बाबाराव कंधारे , कार्यवाह दिलीप पठाडे, भीम जयंती समितीचे अध्यक्ष विजय खडसे, उपाध्यक्ष सागर खडसे, अनाथपिंडक कंधारे, विशाल टोके, विशाल खडसे, संदेश खडसे, मिलिंद गायकवाड, अविनाश पठाडे, यश खडसे, प्रफुल खडसे, अक्षय पठाडे, अजय खडसे, सिद्धार्थ खडसे, सुमेध खडसे, श्रीकांत मुजमुले, सम्यक खडसे, सौरभ खडसे, रोहन पारधे, दिप कंधारे, विशाल पारधे, बालाजी खडसे आदी भीम जयंती समितीचे सर्व सदस्य , रमाई महिला मंडळ आणि बौद्ध उपासक आणि उपासिका यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कर्जबाजारीपणामुळे पित्याने संपविली जीवनयात्रा, आता लेकीच्या लग्नासाठी सरसावला मदतीचा हात; रयत प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

काळाच्या ओघात माणुसकी हरवत चालली आहे असे म्हटले जात असतानाच, हिमायतनगर तालुक्यातील *रयत सेवाभावी प्रतिष्ठान जवळगाव* यांनी सामाजिक बांधिलकीचे एक उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर, हदगाव तालुक्यातील महाताळा (निवघा बाजार जवळ) येथील एका गरीब व पीडित कुटुंबातील कन्या *चि.सौ.का. वैष्णवी गजानन रुमाले* हिच्या लग्नासाठी प्रतिष्ठानतर्फे रविवारी (दि. १९ एप्रिल) कन्यादान साहित्य किट घरपोच देऊन मदतीचा हात देण्यात आला.



*संघर्षातून सावरणाऱ्या माउलीला मिळाला आधार*

महाताळा येथील रुमाले कुटुंबाची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. तब्बल १२ वर्षांपूर्वी वैष्णवीचे वडील गजानन रुमाले यांनी कर्जाला कंटाळून आत्महत्या केली होती. त्यावेळी वैष्णवी केवळ ६ वर्षांची, तिची बहीण ४ वर्षांची आणि भाऊ अवघ्या २ महिन्यांचा होता. पतीच्या निधनानंतर संपूर्ण संसाराचा गाडा आईच्या खांद्यावर पडला. दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून या वीरमातेने आपल्या मुलांना लहानाचे मोठे केले आणि शिक्षणही दिले. मात्र, मुलीचे लग्न ठरल्यानंतर महागाईच्या काळात हा सोहळा कसा पार पाडायचा? या चिंतेने आईला ग्रासले होते.

*दानशूर दात्यांच्या मदतीचा ओघ*

या कुटुंबाची व्यथा *अरुण पाटील चक्रीकर* व *संतोष पाटील चक्रीकर* यांनी रयत सेवाभावी प्रतिष्ठानपर्यंत पोहोचवली. प्रतिष्ठानने मदतीचे आवाहन करताच अनेक दानशूर दात्यांनी सढळ हाताने मदत केली. या मदतीतून संसारासाठी आवश्यक असणारी भांडी व इतर साहित्याची 'कन्यादान किट' तयार करण्यात आली.

*उपस्थितांची उपस्थिती आणि भावूक क्षण*

रविवारी सकाळी १० वाजता वधूच्या घरी हा मदत सोहळा पार पडला. रयत सेवाभावी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष *श्री. सटवाजी गणपतराव पवार (जवळगावकर)* यांच्या हस्ते हे साहित्य सुपूर्द करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानच्या या कार्यामुळे वधू वैष्णवी आणि तिच्या आईचे डोळे पाणावले होते.

*याप्रसंगी उपस्थित मान्यवर:*

* *श्री. सटवाजी गणपतराव पवार* (संस्थापक अध्यक्ष, रयत सेवाभावी प्रतिष्ठान)
* *अरुण पाटील चक्रीकर* (सरपंच)
* *संतोष पाटील चक्रीकर*
* *बावाराव पाटील* (महाताळा)
* *प्रभूजी पाटील* (महाताळा)
* *बंडू मांटाळकर* (पत्रकार, दैनिक सकाळ)
* *भगवानराव पाटील कदम* (वाळकीकर, पत्रकार प्रहार)
* *अमोल पाटील वानखेडे! स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडचे तालुका उपाध्यक्ष (हदगाव)

याव्यतिरिक्त महाताळा गावातील सरपंच, उपसरपंच, ज्येष्ठ नागरिक आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.समाजातील उपेक्षित आणि गरजू कुटुंबांच्या पाठीशी उभे राहणे हेच रयत प्रतिष्ठानचे मुख्य ध्येय आहे. वैष्णवीच्या लग्नात खारीचा वाटा उचलून आम्हाला समाधान मिळाले आहे. - *सटवाजी पवार, संस्थापक अध्यक्ष*

ग्रामस्थांनी रयत सेवाभावी प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले असून, अशा संस्थांमुळेच गरीब कुटुंबातील मुलींची लग्ने निर्विघ्न पार पडत आहेत, अशी भावना व्यक्त केली.

# म.बसवेश्वरमध्ये पोस्टर्स व घोषवाक्य स्पर्धा पारितोषिक वितरण उत्साहात संपन्न

## समाजकार्य विभागातील ४६ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । शिवाजी निरमनाळे**

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील इंग्रजी विभागा तर्फे पर्यावरण संवर्धन, डिजिटल सक्षमीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता व भविष्यकाम, महिला सबलीकरण, आरोग्य जागरूकता, साहित्याची ताकद, मानवी हक्क, वाहतूक शिक्षण, मोबाईल व्यसन आणि सामाजिक कार्य या विषयावर नुकतीच पोस्टर्स व घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेत महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील ४६ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

सामुदायिक कार्य या विषयात प्रथम क्रमांक द्वितीय वर्षातील ऋत्विक मोरे याने मिळविला. साहित्याची ताकद या विषयात द्वितीय क्रमांक प्रथम वर्षातील रुपाली गोरे, मोरे वैष्णवी, गरुड पार्वती यांनी मिळविला. महिला सबलीकरण या विषयात तृतीय क्रमांक द्वितीय वर्षातील ढेकले राजश्री, कांबळे अंकिता यांनी मिळविला. प्रोत्साहनपर पारितोषिक प्रथम वर्षातील गवळी सुषमा हिला देण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून सामाजिक प्रश्नांवर सजग अभिव्यक्ती सादर केली. आकर्षक पोस्टर व प्रभावी घोषवाक्यांमधून त्यांनी समाज जागृतीचा मोलाचा संदेश दिला. वरील सर्व विजेत्या स्पर्धकांना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी, समाजकार्य विभाग प्रमुख प्रो.डॉ.दिनेश मौने, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.रमेश तडवी, ग्रंथपाल डॉ.प्रमोद सराफे, प्रो.डॉ.संजय गवई, परीक्षक डॉ.अमित पवार व प्रा.भाग्यश्री भुजबळ यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना प्रा.रमेश तडवी म्हणाले की, स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढते व सामाजिक जाणीव दृढ होते. भाषा, साहित्य व कला यांचा संगम समाजपरिवर्तनासाठी महत्त्वाचा ठरतो.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, आपल्या महाविद्यालयातील समाजकार्य विभाग हा शैक्षणिक विकासासोबत सामाजिक आणि सांस्कृतिक विकासामध्ये अग्रभागी असतो. समाजकार्य अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे समाजाभिमुख व्यक्तिमत्व घडते. समाजातील गरजा आणि समस्यांची त्यांना जाण असते तेव्हा भविष्यात आपण विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन त्यामध्ये उज्वल यश संपादन करावे अशी सदिच्छाही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. शेवटी डॉ.अमित पवार यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रंगनाथ लांडगे, अजय गायकवाड, गुरुप्रसाद बिरादार आणि संगमेश्वर मुळे यांनी परिश्रम घेतले.

# औद्योगिक समाजातील सामाजिक सेवांवर संशोधन; डॉ.शिवाजी जोगदंड यांना पीएच.डी.उपाधी





लोकनेता न्यूज नेटवर्क

**जिवन जाधव । औसा**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथे पार पडलेल्या सहाव्या दीक्षांत समारंभात डॉ. शिवाजी रघुनाथराव जोगदंड यांना 'डॉक्टर ऑफ फिलॉसफी (Ph.D.)' ही उपाधी प्रदान करण्यात आली.

या समारंभाला भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु, महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुले तसेच राज्य मंत्री व वर्ध्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रो. कुमुद शर्मा यांच्या हस्ते ही उपाधी प्रदान करण्यात आली.

डॉ. जोगदंड यांचा संशोधन विषय औद्योगिक समाजात सामाजिक सेवांचा बदलता स्वरूप (महाराष्ट्र राज्याच्या विशेष संदर्भात) असा असून, औद्योगिकीकरणामुळे सामाजिक सेवांच्या रचनेत, कार्यपद्धतीत व उपलब्धतेत झालेल्या बदलांचा सखोल अभ्यास या संशोधनातून मांडण्यात आला आहे. विशेषतः महाराष्ट्रातील सामाजिक सेवा व्यवस्था, बदलत्या गरजा आणि त्यांचा समाजावर होणारा परिणाम यांचे विश्लेषण यात करण्यात आले आहे.

हे संशोधन प्रो. नृपेंद्र प्रसाद मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले आहे. विशेष म्हणजे, डॉ. जोगदंड यांनी याच विद्यापीठातून एम.एस.डब्ल्यू. (MSW) आणि एम.फिल. (M.Phil.) या पदव्या स्वर्णपदकासह यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. तसेच त्यांनी २०१४ मध्ये णञ्ख-छएढ परीक्षा उत्तीर्ण केली असून, २०१८ पासून ते याच विद्यापीठाच्या वर्धा समाज कार्य संस्थानमध्ये सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

डॉ. जोगदंड हे तालुक्यातील याकतपूर गावाचे रहिवासी असून, त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांनीही त्यांचे विशेष कौतुक केले आहे.

तसेच मामा गोपाळ साठे, धनराज साठे, शिवसेना तालुका प्रमुख विष्णूपंत साठे, रो.ह. योजना तालुका अध्यक्ष सदाशिव जोगदंड, सरपंच बालाजी बाडगिरे, तानाजी जोगदंड, रामभाऊ माने तसेच गावातील माध्यमिक शाळेतील शिक्षक मंजुषा उपाध्याय, रुद्रप्पा क्षीरसागर, सुधा पाटील, परशुराम मगर आणि सिद्दिकी सर आदींनी त्यांचे कौतुक केले.

याशिवाय वर्गमित्र जिनेश्वर बोल, गणेश गवळी, सुधीर झिरमिरे, जावळे महेश, बोडके गणेश, जामगे संतोष, जामगे शिवाजी, पांचाळ अमोल, पांचाळ सोमनाथ, लता माने, रंजना माने, कोमल कंदले, रिजवान आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच गावातील जोगदंड परिवारातील सर्व सदस्यांनीही आनंद व्यक्त करत मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

# निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमाबाबत जनजागृती आवश्यक–संदीप रत्नपारखी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किशोर की. कांबळे । दिग्रस**

भारत निवडणूक आयोग यांच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (डखठ) कार्यक्रमाबाबत सध्या अनेक मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या प्रक्रियेबाबत व्यापक जनजागृती करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत शिवसेना दिग्रसचे उपशहर प्रमुख संदीप रत्नपारखी यांनी व्यक्त केले आहे.



या कार्यक्रमाची माहिती अपुरी असल्यामुळे अनेक नागरिक गोंधळात पडले असून, मॅपिंग प्रक्रिया, कागदपत्रांची आवश्यकता आणि पडताळणी याबाबत स्पष्टता नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासनाने अधिक प्रभावीपणे माहिती पोहोचवणे गरजेचे आहे.यासोबतच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इङज) यांनीही आपली जबाबदारी ओळखून प्रामाणिकपणे आणि पारदर्शकपणे काम करणे आवश्यक आहे. प्रत्येक मतदाराची अचूक माहिती नोंदवून कोणतीही चूक होणार नाही याची दक्षता घेणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच मतदारांनीही प्रशासनास पूर्ण सहकार्य करावे, आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावीत आणि आपल्या नावाची खातरजमा करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.लोकशाही बळकट करण्यासाठी मतदार यादी अचूक असणे अत्यंत महत्त्वाचे असून, या प्रक्रियेत सर्वांनी सकारात्मक सहभाग घेणे गरजेचे आहे, असेही संदीप रत्नपारखी यांनी स्पष्ट केले

# वाघाटी (Rusty spotted cat) जातीच्या दुर्मिळ रानमांजराला त्याच्या अधिवासात केलं मुक्त









लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण । विठ्ठल ममताबादे**

जंगलतोड, वाढते शहरीकरण, आणि पशु पक्षांच्या अधिवासांवर मानवी आक्रमण,बेकायदेशीरपणे केली जाणारी पशुपक्ष्यांची शिकार या सारख्यां बाबींमुळे निसर्गातील अनेक पशुपक्ष्यांच्या व वन्यजीवांच्या प्रजाती नष्ट होत चालल्या आहेत त्यातलीच एक घटना उरण तालुक्यातील धुतूम गावाच्या हद्दीत पाहायला मिळाली. धुतूम गावचे सामाजिक कार्यकर्ते शरद धावजी ठाकूर हे सकाळी वॉकिंगसाठी जात असतानां त्यांना रस्त्याच्या कडेला काहीतरी हालचाल होतांना दिसली. धुतूम हद्दीत कुण्या अज्ञात इसमाने लावलेल्या फासकित ( फासात ) वाघाटी ( Rusty spotted cat) जातीची रानमांजर अडकलेल्या अवस्थेत शरद ठाकूर यांना पाहायला मिळाली लागलीच त्यांनी सामाजिक कार्यात आणि खास वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनाच्या कार्यात अग्रेसर असणारी ज्या संस्थेच्या माध्यमातून आज पर्यंत अनेक प्राणी-पक्षांना, वन्यजीवांना वाचविण्याचं काम करून त्यांना त्यांच्या अधिवासात मुक्त करण्याचं काम केलं अशी प्राणीमित्र संघटनां अर्थात केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक आणि प्राणीमित्र महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर व प्रविण कडू यांना ह्या गोष्टीची माहिती देऊन कळविण्यात आले. ही माहिती मिळताच लागलीच राजू मुंबईकर यांच्या सोबत केअर ऑफ नेचर संस्थेची टीम घटनास्थळी जावून जागेची पाहणी करून लागलीच त्या फासकी ( फासा) मधून त्या वाघाटी जातीच्या ( Rusty spotted cat) रानमांजराची अगदी सुखरूपपणे सुटका करून तिला एका लोखंडी पिंजर्यात आणून लागलीच राजू मुंबईकर यांच्या माध्यमातून महाराष्ट्र वनविभाग उरण वनपरिक्षेत्राचे वनपाल सुनिल महाडिक यांना कळविण्यात आले व त्या वाघाटी जातीच्या रानमांजराला कुठलीच इजा झाली नसल्या कारणामुळे तिला मौजे वेश्वी - उरण येथील जंगलात वनगार्ड राजेंद्र करांडे यांच्या समक्ष त्यांच्या अधिवासात मुक्त संचार कारणासाठी सुखरूपपणे मुक्त करण्यात आली.अत्यंत लाजाळू आणि निशाचर असणारी प्रजाती ( Rusty spotted cat )मराठीत हीला वाघाटी म्हणतात. जगातील आकाराने सर्वात लहान असणारी मांजर (रानमांजर) इंग्रजी नावाप्रमाणेच तीचं शरीर एखाद्या गंज लागलेल्या धातूच्या रंगाप्रमाणे असते ह्या रंगामुळेच ती आपल्या अधिवासात बेमालूमपणे मिसळून जाते. निशाचर आणि त्यात अत्यंत लाजाळू असल्यामुळे वाघाटीचे दर्शन सहजपणे होत नाही त्यामुळेच ही मांजर दुर्मिळ प्रजातीची मानली जातोय.

वाघाटी जातीच्या रानमांजराला वाचण्यासाठी उरण -धुतूम गावातील सामाजिक कार्यकर्ते शरद ठाकूर , निकेश मढवी, कपिल घरत, प्रतिक ठाकूर, देवेंद्र ठाकूर आणि धुतूम गावातील ग्रामस्थ सोबतच केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर,प्रविण कडू आणि कॉन संस्थेचे टीम यांनी विशेष मेहनत घेतली. या सर्वांच्या प्रयत्नातून वाघाटी जातीच्या ह्या दुर्मिळ रानमांजराची सुखरूपपणे सुटका करून तीला तीच्या मुक्त अधिवासात ( जंगलात ) मुक्त संचार करण्यासाठी मुक्त केल्याने ह्या सर्वांचे सर्व स्तरांतून कौतुक केले जात आहे

# येल्लापुरयेथील भीम जयंतीत गोंधळ घालणाऱ्या; चौघांवर गुन्हा दाखल

## मुख्य आरोपींवर गंभीर कलमांखाली कारवाई

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जिवती । प्रतिनिधी**

जिवती । तालुक्यातील येल्लापुर येथे १४ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती कार्यक्रमात अचानक निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीने सामाजिक सलोख्याबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पुतळा समितीच्या वतीने नियोजनबद्ध पद्धतीने जयंती साजरी करण्याचे ठरविण्यात आले होते; मात्र कार्यक्रमाच्या वेळी काही व्यक्तींनी उघड विरोध दर्शवत गोंधळ घालण्याचा प्रयत्न केल्याने परिस्थिती चिघळली आणि अखेर पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र विठ्ठल मानकर यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळपासूनच गावातील नागरिक, समाजबांधव आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंतीनिमित्त ध्वजारोहण, पुष्पहार अर्पण आणि सामाजिक संदेशपर कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. मात्र कार्यक्रम सुरू होण्याच्या अगोदरच गावातील काही व्यक्तींनी पुतळा समितीच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करत उघडपणे विरोध नोंदविला.



तक्रारीनुसार, नितीन भास्कर सोनकांबळे, सिद्धोधन निखाडे, कल्याण सरोदे, अमोल निखाडे आणि ज्ञानपाल सरोदे या व्यक्तींनी कार्यक्रमाच्या ठिकाणी येऊन ही पुतळा समिती जुनी झाली आहे, आम्हाला तिची कोणतीही माहिती नाही, आणि अध्यक्षांना झेंडा फडकू देणार नाही असे म्हणत कार्यक्रमात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. या आक्षेपांमुळे वातावरण तणावपूर्ण बनले.या वादाला शांत करण्यासाठी गावातील समाजबांधव सुबोध चिकटे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. मात्र परिस्थिती निवळण्याऐवजी अधिकच चिघळली. तक्रारीनुसार, सिद्धोधन निखाडे आणि नितीन सोनकांबळे यांनी चिकटे यांच्याशी उर्मट भाषेत वाद घालत, तुझा या जयंतीशी किंवा गावाशी काही संबंध नाही, तू राजकीय पक्षाचा कार्यकर्ता आहेस, त्यामुळे या प्रकरणात हस्तक्षेप करू नकोस अशा स्वरूपाचे वक्तव्य केले. या वक्तव्याने वातावरण अधिक तापले.याच दरम्यान, कल्याण सरोदे आणि ज्ञानपाल सरोदे यांनी हातात काठ्या, गोठे घेऊन पुतळा समितीचे अध्यक्ष आणि सुबोध चिकटे यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. परिस्थिती बिघडत असल्याचे लक्षात येताच गावातील इतर नागरिकांनी तत्काळ हस्तक्षेप केला. तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भारत कांबळे यांनी पुढाकार घेत संबंधितांना आवरण्याचा प्रयत्न केला; मात्र ते ऐकण्यास तयार नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.घटना अधिक गंभीर रूप धारण करण्याची शक्यता लक्षात घेऊन उपस्थित नागरिकांनी तत्काळ पोलिस प्रशासनाला माहिती दिली. माहिती मिळताच जिवती पोलिस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि वाढता वाद नियंत्रणात आणला. पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे संभाव्य हिंसाचार टळला, ही बाब महत्त्वाची ठरते.घटनेनंतर परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर, पुतळा समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र मानकर आणि तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भारत कांबळे यांनी पोलिस अधिकाऱ्यांना विनंती करून त्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर जगदीश मुंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जयंती कार्यक्रम पार पडला, ही वस्तुस्थिती तक्रारीत स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे.या संपूर्ण घटनेत केवळ कार्यक्रमात अडथळा आणणे इतपत मर्यादा राहिलेली नाही, तर मारहाणीचा प्रयत्न, अश्लील शिवीगाळ, उघड धमक्या आणि सामाजिक सलोखा बिघडवण्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसारख्या संवेदनशील आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला विरोध केल्याने या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

पुतळा समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र मानकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, संबंधित व्यक्तींनी केवळ कार्यक्रमात अडथळा आणला नाही, तर समितीच्या पदाधिकाऱ्यांना व उपस्थित नागरिकांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. तसेच, सुबोध चिकटे यांच्याविरोधात राजकीय हेतूने खोटे आरोप करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे.या तक्रारीची गंभीर दखल घेत जिवती पोलिसांनी तात्काळ कारवाई करत नितीन भास्कर सोनकांबळे, सिद्धोधन निखाडे, कल्याण सरोदे आणि ज्ञानपाल सरोदे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५२ (मारहाण), ३५१(२) (धमकी), २९६ (सार्वजनिक शांततेचा भंग) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. या कलमांनुसार दोषींवर कठोर कारवाईची तरतूद असून, पुढील तपास सुरू आहे.

**नितीन सोनकांबळे, सिद्धोधन निखाडे, कल्याण सरोदे व ज्ञानपाल सरोदे या चौघांनी जाणीवपूर्वक जयंती कार्यक्रमात विरोध करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला. संविधानिक पद्धतीने कारवाई केल्यानंतर त्यांच्यावर कडक गुन्हे दाखल झाले आहेत. सुबोध चिकटे यांच्यावर राजकीय हेतूने खोटे आरोप करण्यात आले आहेत.**

**– मच्छिंद्र मानकर अध्यक्ष,**
**डॉ. बा. आं. पु. समिती, जिवती**

# चंद्रपूरात मा.पंकजा मुंडे यांचे भव्य स्वागत विकासाच्या मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिद्धेश्वर केंद्रे**

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री तथा वंजारी समाजाच्या नेत्या मा. पंकजा मुंडे यांचे चंद्रपूर येथे आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी वंजारी सेवा संघ व ओबीसी समाजाच्या वतीने भव्य स्वागत व सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाकाली नगरीतील रेस्ट हाऊस येथे त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी आमदार मा. सुधीर मुनगंटीवार, महानगरपालिका चंद्रपूरच्या महापौर सौ. संगीताताई खांडेकर तसेच माजी उपमहापौर मा. राहुलजी पावडे यांची प्रमुख उपस्थिती नोंदविण्यात आली.

कार्यक्रमास वंजारी सेवा संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये सुमितजी करपे (जिल्हाध्यक्ष),



अतुलजी हेमके (उपाध्यक्ष, पूर्व विदर्भ), संगीताताई धात्रक (महिला जिल्हाध्यक्ष), अभिषेक डोईफोडे (नगरसेवक), संदीपजी कानकाटे (शहराध्यक्ष), राहुलजी खांडरे (सचिव) तसेच इतर मान्यवरांचा सहभाग होता.

यावेळी आकाशवाणी रोड, जिल्हा स्टेडियमच्या मागे, सिव्हिल लाईन परिसरात लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या चौकाच्या उद्घाटनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चौकाचे उर्वरित काम लवकर पूर्ण व्हावे, अशी मागणी करण्यात आली असून त्याबाबत मा. पंकजाताईंनी सकारात्मक भूमिका दर्शवली. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत समाजाच्या विकासासाठी पुढील वाटचालीबाबत सकारात्मक चर्चा केल्याचे सांगण्यात आले.

# पंचशील विद्यालयात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

शहरातील आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयात महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर,पर्यवेक्षक जाधव,एम.आर.बेळकुंदे,आदर्श परीक्षा नियंत्रक ओमकार मुधोळ, गजानन महाजन,यांनी श्री.बसवेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून व पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी पर्यवेक्षक श्री.बेळकुंदे म्हणाले की,महात्मा बसवेश्वरांनी समाजातील जातीभेद, अंधश्रद्धा आणि अन्याय याला विरोध केला.बसवेश्वरांनी 'कायकवे कैलास' (काम म्हणजेच पूजा) हा संदेश दिला आणि श्रमाला मोठे महत्त्व दिले.

त्यांनी लिंगायत धर्माचा प्रसार केला.ज्यात



समानता साधेपणा आणि ईश्वरभक्ती यावर भर आहे. त्यांनी 'वचन' या शैलित अनेक काव्यरचना केल्या,ज्यातून त्यांनी आपले विचार मांडले.बसवेश्वरांनी स्त्री-पुरुष समानता आणि सर्वांना समान हक्क यांचा पुरस्कार केला,त्यामुळे ते भारतीय समाज सुधारणेतील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्व मानले जातात,असे सांगून पर्यवेक्षक बेळकुंदे यांनी महात्मा बसवेश्वरांच्या कार्याला उजाळा देत अभिवादन केले.याप्रसंगी प्रमोद जाधव,भागवत पावडे सृष्टी व कनिष्क महाजन हे दोन चिमूकले उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमकार मुधोळ यांनी केले.

# अंबाडी तांडा आदर्शगांव मोहीम तालुक्याला दिशादर्शक ठरेल; मान्यवरांचे शाल व पुष्पहार देऊन स्वागत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

महामानव महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंतीनिमित्त अंबाडी तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे १५ तारखेला एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. वसंतराव नाईक सामाजिक व ग्रामविकास बहुउद्देशीय सेवा भावी संस्था आदर्शगांव अंबाडी तांडाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्व मान्यवरांचे शाल व पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच जोशना कैलास जाधव तर प्रमुख प्रशिक्षक म्हणून शेतकरी संघटनेचे रमेश कदम पाटील, मंडळ कृषी अधिकारी बालाजी शेन्नेवाड, ग्राम विस्तार अधिकारी कैलास गायकवाड,




डॉ वर्षा गोवंदे सि.एच.ओ. यांनी गावकऱ्यांना आदर्शगाव, योजना, सप्तसुत्री, शेती व शेतकरी गट, आरोग्य विषयक जागृती, सामाजिक सलोखा, याविषयी सरळ व सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. अंबाडी तांडा आदर्श गाव मोहीम किनवट तालुक्याला दिशादर्शक ठरेल असा विश्वास यावेळी रमेश कदम यांनी व्यक्त केला.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्राम कार्यकर्ता अरविंद जाधव, नवयुवक पृथ्वीराज कैलास जाधव, संस्थापक सचिव सचिन जाधव यांनी अथक प्रयत्न केले. या कार्यक्रमास कैलास मंगुसिंग जाधव, मा.सरपंच किशनराव लखुजी राठोड, रामदास शेडमाके उपसरपंच व ग्राम पंचायत चे सर्व सदस्य उपस्थित होते. मा.बालुसिंग पवार तंटामुक्ती अध्यक्ष, महिला बचत गटाच्या सिआरपी सुमीत्रा मोहुर्ले, रेणुकाबाई राठोड, शांताबाई लोभाजी जाधव, जेष्ठ नागरिक मंगुसिंग जाधव व संस्थापक सदस्य गुलाब सिताराम मडावी, सर्व महिला बचत गटांच्या सदस्या, शेतकरी, शेतमजूर मोठया संख्येने उपस्थित होते.

सर्व प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा आदर्शगांव व प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा आदर्शगांव अंबाडी तांडा वतीने घेण्या आला. संस्थेचे मनुष्यबळ व समाजीक कार्यकर्ते विनोदजी कदम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन मोहन जाधव अंबाडीकर संस्थापक अध्यक्ष वसंतराव नाईक सामाजिक व ग्रामविकास बहुउद्देशीय सेवा भावी संस्था आदर्शगांव अंबाडी तांडा यांनी केले

# एरंडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण ला सुरुवात



लोकनेता न्यूज नेटवर्क

**जिवन जाधव । औसा**

औसा तालुक्यातील एरंडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात करण्यात आली एरंडी गावात ग्रंथ दिंडी व शोभायात्रेने विना पूजन व ज्ञानेश्वरी ग्रंथ पूजन करून सप्ताह ला सुरुवात करण्यात आली एरंडी येथे गेल्या सोळा वर्षापासुन अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो ,या सप्ताहाच्या माद्यमातुन गावात भक्तीमय वातावरण पहायला मीळते ,सात दिवस चालाणार्या सप्ताहात काकडा,हरीपाठ ,हरिजागर ,महिला भजन ,सह किर्तन सोहळा आयोजीत करण्यात आला असुन ,एरंडी येथील सप्ताहात ह .भ. प योगीराज महाराज सारोळकर ह .भ. प बजरंग महाराज गोपाळवाडी कर ह .भ. प व्यंकट महाराज शेलुकर ,ह .भ प मोहन महाराज सिरसलकर ,ह भ प विलास महाराज महापूरकर,ह भ प उद्धव महाराज रमजानपूरक,

ह भ प दत्ता महाराज व्हटीकर सह काल्याचे किर्तन ह भ प बळवंत महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतुन होणार आहे तरी एरंडी सह परीसरातील भाविकांनी सप्ताहाचा आनंद घ्यावा असे एरंडी ग्रामस्थांच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे ,,,

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिसोडा खुर्द येथे शाळा प्रवेशोत्सव व सत्कार समारंभ संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । ज्ञानेश्वर जगताप**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिसोडा खुर्द च्या माजी विध्यार्थिनी श्रीमती आरती रेखा ज्ञानेश्वर सोनुने यांची

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला,तसेच ईयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेश सोहळा साजरा करण्यात आला. या प्रसंगी सत्कार सोहळ्याचे अध्यक्ष भोकरदन तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री.डॉ. भरत वानखेडे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना जिल्हा परिषद शाळा या ग्रामीण भागातील विद्यार्थी घडविण्याचे कार्य करतात आणि या शाळातील विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात मागे नाही असे प्रतिपादन केले याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून



श्री प्रल्हाद पाटील गोरे ( मा. प.स. सदस्य )श्री कौतिक पाटील जगताप (सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती भोकरदन )श्री. बी. यु. सपकाळ सर ( के. प्र जळगाव सपकाळ ) शा. व्य. स. अध्यक्ष श्री. संदीप शेठ गोरे उपाध्यक्ष श्री. रामेश्वर जगताप मा. शा. व्य. स. अध्यक्ष श्री. विजय जगताप,ग्रामपंचायत सदस्य श्री. राजू गोरे, श्री. प्रमोद जगताप श्रीम. राधा साळवे शेख रिजवान यांची उपस्थिती होती.याप्रसंगी श्री राजू गोरे सर, डॉ सांडू जगताप,श्रीमती पवार मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले श्रीमती आरती सोनुने यांनी शाळेतील आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देतांना काही प्रसंग सांगितले व शिक्षकां विषयी कृतज्ञता व्यक्त केली. चिमुकल्या सोबत अगदी खेळीमेळीच्या वातावरणात संवाद साधला. शाळेविषयी बोलतांना प्राथमिक शिक्षण जि प शाळेत व माद्यमिक शिक्षण विद्या विकास विद्यालय येथे घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता चिकाटीने अभ्यास करावा असा सल्ला दिला..आत्मीयता व्यक्त करताना जुन्या आठवनींना उजाळा दिला या कार्यक्रमाला गावातील पालक, ग्रामस्थ तथा महिला वर्ग यांची विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गोसावी सर, प्रस्थाविक मु. अ. श्री. विष्णू सपकाळ सर तर मनोगत श्री. लोखंडे सर व घोरपडे सर भागवत सर, राऊत मॅडम यांनी व्यक्त केले. आभार प्रदर्शन श्री. वानखडे सर यांनी केले.

# महिला आरक्षण प्रश्न पेटला;दिग्रस मध्ये भाजप-शिवसेनेचे निषेध आंदोलन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किशोर की. कांबळे । दिग्रस**

लोकसभेमध्ये महिला आरक्षण विधेयकाला काँग्रेस पक्षाने विरोध केल्याच्या निषेधार्थ दिग्रस शहरात भाजप व शिवसेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तीव्र आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत काँग्रेसच्या भूमिकेचा निषेध नोंदवला. महिलांना राजकीय क्षेत्रात योग्य प्रतिनिधित्व मिळावे, ही काळाची गरज असून अशा महत्त्वाच्या विधेयकाला विरोध करणे म्हणजे महिलांच्या हक्कांवर गदा आणण्याचा प्रकार असल्याची प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

आंदोलनात भाजप व शिवसेनेचे स्थानिक




पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत आंदोलन शांततेत पार पडले.

महिलांच्या सन्मान व हक्कांसाठी भविष्यातही लढा सुरूच ठेवणार असल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी यावेळी दिला. या आंदोलनात शिवसेना व भाजप पक्षाच्या महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## कणकी येथे श्री दत्त ज्ञानसज्ञ रामचरित्र अखंड सप्ताह संपन्न

# किनवट तालुक्यातील टोकावर असलेला गाव म्हणजे कणकी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मांडवी । प्रतिनिधी**





कणकी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्री दत्त ज्ञानयज्ञ रामचरित्र सप्ताह दि. ११/०४/२०२६ ते १८/०४/२०२६ पर्यत आयोजीत करण्यात आले होते तरी सर्व भावीक भक्तांनी रामचरित्र कथेचा लाभ घेतला आणि रोज प्रवचनाच हरीपाठ व काकडा काढण्यात आली ह.भ.प.श्री गुरुदेव महाराज फुलाजी बाबा पारायन रोज सकाळी ७ ते ९ काकडाआरती काढण्यात आली आणि सकाळी ६ ते ७ हरीपाठची भी घेण्यात आले होते

काल्याच्या कीर्तनाच्या निमित्ताने कणकी येथे पार पडलेल्या भव्य धार्मिक सोहळ्यात गोकुळातील कृष्णलीलेचा जणू सजीव अनुभव भाविकांना घेता आला. श्री.गुरु मंत शाहापूरी महाराज आनंदमट झटला यांच्या प्रभावी, विनोदी व तितक्याच मार्मिक कीर्तनातून उपस्थित ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले.

कीर्तनादरम्यान सगळं गोकुळ मिरवणूक चालली... या वर्णनातून महाराजांनी भगवान श्रीकृष्णाच्या बाललीलेचे अत्यंत रसाळ चित्रण केले. इंद्राने केलेला अभिषेक, काळ्या कपिला गायीचे पूजन, तसेच दही–दूध–तूप–लोण्याचा साज या सर्व प्रसंगांना त्यांनी अत्यंत प्रभावी शैलीत सादर करत भक्तिरसाची उधळण केली.

यशोदा मातेच्या घरातील गवळणींच्या तक्रारी, श्रीकृष्णाने फोडलेले ताकाचे माठ, गोपाळांच्या खेळांचे वर्णन, या या राधिकेचा भवरा... यांसारख्या ओव्या व गवळणींमधून उपस्थितांना गोकुळातील वातावरणाचा जिवंत अनुभव मिळाला. समाजातील विसंगतींवर भाष्य करताना काही भजन मंडळांच्या अयोग्य सादरीकरणावरही महाराजांनी परखड शब्दांत टीका केली.

कीर्तनातून त्यांनी सध्याच्या समाजातील एकोपा, श्रद्धा व संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित करत मोट मोर्चा नव्हे, तर एकत्र येऊन भक्तीचा मार्ग स्वीकारा असा संदेश दिला.

या कार्यक्रमाला श्री.वेंकटरेड्डी चिलकुलवार साहेब (कणकी )
आणि
श्री. प्रशांत रेड्डी क्लेमवार
कणकी तांडा येथील श्री. विकास शेषरावजी नाईक
श्री. उद्धव चतरू राठोड
श्री डॉ. संजय बळीराम जाधव
श्री. पवन राजाराम चव्हाण
श्री.विनोदभाऊ राठोड उपसरपंच
श्री बोरकर साहेब गाम विकास अधीकारी
श्री. संजय विठूजी वाढगुरे ( समाज सुधारक कणकी )
(कर्यक्रमाचे मेन सूत्रधार
श्री. डॉ. संतोष माधव वाढगुरे कणकी ) आणि
तबला वादक देविदास दशरथ चौधरी
ऑर्गन वादक / गायक आशिष पुणेकर (गोंदीया)
हार्मोनियम वादक /गायक श्री.गंगाधर विश्वनाथ मोहुर्ले (कनकी)
गायक : ह.भ.प.श्री गुरूदेव महाराज चौधरी (वाढोणा)
काल्याचा कीर्तन व दही हंडी:– श्री संत शाहापुरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले
श्री सुदरसिंग जाधव महाराज
श्री अनिल गंगाराम मोहुर्ले, श्री मारोती पांडुरंग गुरनुले
श्री गोपाल देवरावजी गुरनुले मेर
श्री विठ्ठल महाराज लेडगुरे,
श्री भिमराव महारज आत्राम
श्री पवनलाल जेस्वाल
श्री लतीश रेड्डी लोकावार
श्री मारोति गंगाराम गुरनुले
श्री आबंदास लक्ष्मण वाडडारे
श्री शंकर विश्वनाथ मोहुर्ल
श्री. विष्णू पोचूराम गुरनुले मेन आयोजक
श्री. निलेश प्रकाश राठोड
श्री. भारत गंगाराम जेगटे
श्री. मारोती पा. गुरनुले
श्री. प्रवीण मनोहर राठोड
श्री. सुधाकर महाराज यांचे भारूड प्रवचन करण्यात आले

श्री संत शाहापुरी महाराज समस्त गावकरी व संपुर्ण महीला बचत गट, फुलाजी बाबा मंडळ, काकडा आरती मंडळ कणकी जय सेवालाल मंडळ कनकी तांडा जय जंगो रायताड मंडळ डोगरगाव यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या काल्याच्या कीर्तनाने कणकी परिसरात आध्यात्मिक ऊर्जा निर्माण केली असून, ग्रामस्थांनी या सोहळ्याचे उत्स्फूर्त स्वागत केले.

**कणकी येथे मंत महाराजांची भेट घेताना लोकनेता तालुका प्रतिनिधी डॉ.भारत उद्धव राठोड**



# मुख्य बाजारपेठेत चौंडेश्वरी मंडळाकडून पाणपोई सुरू

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

उष्णतेचा वाढता पारा विचारात घेता मुख्य बाजारपेठेत बाहेरगावावरून येणाऱ्या नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय दूर करण्यासाठी व्यापारी बांधव आणि कोष्टी समाज ट्रस्ट – बांधवांच्यावतीने मुख्य मेनरोड येथे पाणपोई सुरू करण्यात आली आहे . या पानपोईचे उद्घाटन देखील जेष्ठ समाज बांधवांच्या हस्तेच करण्यात आले .

रविवार दिनांक २० एप्रिल २०२६ अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर पानपोईचे उद्घाटन करण्यात आले, पाणी पोईसाठी मोठाल्या रांजणातून पाणी नैसर्गिक रित्या थंड व्हावे यासाठी मोठे रांजण उपलब्ध केले आहे, त्याला कपडा देखील गुंडळला आहे, जेणेकरून पाण्याचा थंडावा आणखी वाढावा, याशिवाय मुख्य रस्त्यावर पाणपोईच्या वरती मोठा कपडा देखील टाकलेला आहे – जेणेकरून पाणी स्वच्छ राहील




त्यामध्ये घाण जाणार नाही याची देखील मंडळांनी दखल घेतली आहे .यावेळी आलमप्रभु देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष दिलीप शाळू महाराज , नगरसेवक विठ्ठल बागडे , ज्येष्ठ समाज बांधव पांडुरंग बुगड , आबासाहेब नवले, धनंजय बाबर, धनंजय बागडे , पांडुरंग वरवडे, अंबादास वरवडे , बापू डिसले, संदीप बागडे , शंकर म्हेत्रे, सुभाष उपरे, बाळासाहेब फासे आदींची उपस्थिती होती .

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूकीच्या रिंगणात उ.बा.टा शिवसेना व काँग्रेसमध्ये चुरस होण्याची शक्यता

## दोन्ही पक्षाचा १२–१३ मतदान असल्याचा दावा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**





नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीसाठी मतदान यादी तयार करण्याचा पहिला टप्पा जिल्ह्यात पूर्ण झाला आहे हिमायतनगर तालुक्यातील सेवा सहकारी सोसायटी विविध सेवा सहकारी सोसायटी कारखाना मजूर संस्था आदींचे ठराव पारित करून मतदानाचा अधिकार अनेक उमेदवारांना देण्यात आला आहे त्यात हिमायतनगर तालुक्यात या बँकेच्या निवडणुकीसाठी २१ जणांना मतदानाचा अधिकार असणार आहे त्यामुळे या निवडणुकीच्या रिंगणामध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसेनेकडून १०ते १३ मतदार आमच्याकडे असल्याचा दावा त्यांनी केला आहे तर दुसरीकडे माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांच्या काँग्रेस पक्षाने सुद्धा आम्ही बहुमतामध्ये असल्याचा दावा केला आहे त्यामुळे या संचालक पदाच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस व उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसेनेमध्ये ही निवडणूक होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये हिंगोली लोकसभेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या शिवसेनेकडून वडगाव नगरीचे माजी सरपंच तथा युवा सेनेचे नेते विशाल राठोड व माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर किव्हा ऐनवेळी इतर काँग्रेस उमेदवार या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता आहे पण विद्यमान खासदार नागेश पाटील आष्टीकर हे हदगाव येथील जागेवर त्यांचे चिरंजीव कृष्णा पाटील आष्टीकर यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा आहे त्यामुळे महाविकास आघाडी करून त्यांनी हिमायतनगर येथील जागा काँग्रेस ला देण्यासाठी येथील सामान्य कार्यकर्त्याचा बळी देण्याची शक्यता आहे त्यामुळे या निवडणुकीच्या रिंगणात दिग्गज व मातब्बर नेते जिल्हा बँकेच्या संचालक मंडळात असण्याची शक्यता आहे त्यामुळे कोणता नेता कोणत्या कार्यकर्त्याचा बळी देतो हे मात्र पहावे लागणार आहे ही निवडणूक छोटी जरी असली तरी दिग्गज नेत्यांचा यात सहभाग असणार आहे नेते काय निर्णय घेणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे तालुक्यातील मतदारावर आतापासूनच लक्ष ठेवण्यात येत आहे पण दुसरीकडे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून वडगाव नगरीचे माजी सरपंच विशाल राठोड हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये आपले नशीब आजमावण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे या भागात शिवसेनेचे वर्चस्व अगोदर पासून असल्यामुळे त्यांच्याकडे १० ते १३ मतदानाचा अधिकार असणारे उमेदवार असल्याचा दावा करण्यात आला आहे पण त्यांना ह्या निवडणुकीत मोठ्या मातब्बर नेत्याचा सामना करावा लागणार असल्याचे सध्या तरी दिसून येत आहे पण एन वेळी महाविकास आघाडी झाल्यास सर्वसामान्य कार्यकर्त्याचा बळी दिला जातो कि काय अशी पण चर्चा जोरदार रंगत आह

# उन्हाच्या तडाख्यात गडचांदूरकरांना दिलास;नगर परिषदेचे पाणपोई व स्वच्छतेसाठी धडाकेबाज पाऊल!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोरपना । पवन देरकर**

कडक उन्हाच्या झळांनी हैराण झालेल्या गडचांदूर शहरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने पुढाकार घेत विविध जनहिताचे उपक्रम सुरू केले आहेत. वाढत्या तापमानामुळे पिण्याच्या पाण्याची तीव्र गरज निर्माण झाल्याने शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी पाणपोई उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.






शहरातील शेडमाके चौक तसेच भारत पेट्रोल पंप परिसरात नागरिकांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची पाणपोई सुरू करण्यात आली असून, प्रवासी, वाहनचालक, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी हा उपक्रम मोठा आधार ठरत आहे. उन्हाच्या कडाक्यात तहानलेल्या नागरिकांना या पाणपोईमुळे तात्काळ दिलासा मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

या पाणपोईंचे उद्घाटन मा. शेख सरवर शेख शालू (पाणी पुरवठा सभापती) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी नगरपरिषद नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

यासोबतच शहर स्वच्छतेलाही प्राधान्य देत नगरपरिषदेकडून सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी करण्यात येत असून, आधुनिक स्वच्छता यंत्रणांच्या माध्यमातून शहर अधिक स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. रस्ते, चौक व सार्वजनिक ठिकाणांची नियमित साफसफाई करून नागरिकांना स्वच्छ वातावरण उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

या प्रसंगी नगराध्यक्ष निलेश भाऊ तजने, उपनगराध्यक्ष संजय भाऊ मेंढी, रामसेवक भाऊ मोरे (सभापती), मा. मनीषा ताई परचाके, मा. सुरेश मेघ्राम सर यांच्यासह नगरपरिषदेचे कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.वाढत्या उन्हाचा तडाखा आणि पाण्याची वाढती गरज लक्षात घेता नगरपरिषदेने उचललेले हे पाऊल नागरिकांसाठी मोठा दिलासा देणारे ठरत असून, गडचांदूर शहराच्या विकास आणि स्वच्छतेच्या दिशेने हे एक सकारात्मक आणि कौतुकास्पद पाऊल मानले जात आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933